MHGA010009092021

**<u>विद्यमान जिल्हा न्यायाधीश-२, गडचिरोली यांचे न्यायालयात</u>**

( पिठासीन अधिकारी श्री. प्रविण व्ही. चतुर )

<u>नि. दि. अपील क्र. १७/२०२१</u>

महेंद्रसिंग मक्कड
वि.
जेगिंदरसिंग मक्कड व इतर

................

**<u>आदेश</u>**

(नि.क्र.२७ वर)
(दि.०७.०४.२०२६)

१. दि.२७.०१.२०२६ रोजी प्रस्तुत प्रकरणातील अपिलार्थीने तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला आहे.

२. वरील अर्जात तसेच सदर अर्जाच्या प्रार्थनेच्या कलमात अनवधानाने आणि सद्भावना चुकीमुळे महत्वाची व आवश्यक बाब समाविष्ट करता आली नाही. उपरोक्त बाब तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जावर सुनावणीची तयारी करतांना निदर्शनास आली. यापुर्वी वरील चुक लक्षात न आल्यामुळे योग्य दक्षता बाळगुनदेखील यापुर्वी ती दुरुस्ती करता येऊ शकली नाही.

३. प्रस्तावित दुरुस्तीमुळे उत्तरवादी / गैरअर्जदारांचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती अभिलेखावर आल्यास तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज निकाली काढण्यास मदत होईल. याऊलट जर प्रस्तावित दुरुस्ती करण्यास अपिलार्थीला परवानगी दिली नाही तर अपिलार्थीचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल. करीता तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जामध्ये दूरुस्तीकरीता अर्ज दाखल केला आहे.

४. गैरअर्जदारांनी सदर अर्जास उत्तर नि.२८ दाखल केले की, वास्तविक पाहता अर्जदाराने आपले उत्तर नि.क्र. २७ मध्ये अ) या परिच्छेदात सुचविलेल्या तथाकथीत दुरुस्तीचे कथन हे अर्जदाराने मामल्यात नि.क्र. २० मध्ये केलेल्या अर्जात यापुर्वीच करण्यात आलेली आहे. त्यामुळे अर्जदारांची या अर्ज नि.क्र.२७ मध्ये सुचविलेली दुरुस्ती ही अप्रस्तुत आहे. तसेच अर्जदाराने सदरहु दुरुस्ती अर्जाती ब) या परिच्छेदामध्ये प्रार्थना क्र. 1 मधील सुचविलेली दूरुस्ती ही अप्रस्तुत आहे. त्यामुळे अर्जदारांचा सदरहु दुरुस्ती अर्ज खारीज होण्यास पात्र आहे. करीता सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती करीत आहे.

५. उभय पक्षकारांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. नि. क्र.२० चा अर्ज व त्यातील कथन वाचले आणि प्रस्तावीत दुरुस्ती विचारात घेतली.

६. अपिलार्थींच्या कथनानुसार उत्तरवादी यांनी संपुर्ण बांधकाम पाडून टाकले आणि अपिलार्थींचा हक्क डावलुन ते नविन बांधकाम करीत आहे. या परिस्थीतीचा विचार करता सदरची घटना, अपिल आणि मनाई हुकूमाचा अर्ज प्रलंबित असतांना घडली असल्याचे दिसुन येते.

६. अपिलार्थींच्या विद्वान वकिलांनी सदर प्रकरणात मा. मुंबई उच्च न्यायालयाचे ***'Ram Richpal Jain -vs- Dara Khurshadji Amrolia & Ors.,Dated 06-06-2011,Writ Petition No. 3150 of 2010, 2012(2)BCR392,*** या निकालपत्राचा आधार घेतला. त्यानुसार प्रस्तावीत दुरुस्तीमधील कथने अपिलार्थी यांच्या प्रकरणाशी पुरक असल्याने ती आवश्यक आहे.

७. वरील परिस्थीतीत अपिलार्थी यांनी विनंती केलेल्या प्रस्तावीत दरुस्ती ही नि.२० मधील त्यांच्या अधिकारासंबधी असल्याने व त्यात नमुद केलेल्या हकीकतीचे, तसेच प्रकरण प्रलंबित असतांना घडलेली घटना संबधीत आहे. करीता प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी पुढील आदेश पारित केला.

<u>आदेश</u>

१. अर्ज नि.क्र. २७ मंजुर.

२. प्रस्तावीत दुरुस्ती सदर आदेशाच्या तारखेपासुन ०७ दिवसात करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRAVIN VIMALNATH CHATUR
Date: 2026.04.07 12:01:51 +0530

( **प्रविण वि. चतुर** )
जिल्हा न्यायाधीश -२
गडचिरोली

दिनांक : ०७/०४/२०२६